**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५१/२०१३ मधील नि. ३१ वरील</u>**

**<u>आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा हा मालकी हक्काचा ठराव, खरेदीपत्र निरर्थक व विनाअंमलपात्र आहे असा ठराव करुन मिळण्याकरीता तसेच कब्जा व निरंतर करीता दाखल केला आहे. खरेदीपत्र विनाअंमलपात्र व निरर्थक असल्याचा ठराव होवून मिळण्याची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने दि. ०८/०६/१९८७ रोजीच्या खरेदीखताएवढी दाव्याची आकारणी करुन त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क देणे गरजेचे आहे. परंतु पुर्वी योग्य ती आकारणी केलेली नसल्याने आता योग्यती आकारणी करुन योग्य ते मुद्रांक शुल्क देत आहोत असा मजकूर लिहिण्यास परवानगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज आहे.

०२. सदरच्या अर्जाला प्रतिवादीतर्फे आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की दावा परि.क्र. ९ मध्ये मुद्दा क्र. २ असा मुद्दाच नाही. तसेच वादीला नक्की कोणत्या वादकथनात दुरुस्ती मागायची आहे हे समजून येत नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा. तसेच अर्जात सुचविलेली आकारणी देखील चुकीची आहे.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे अवलोकन केले. दाव्यातील मागण्या विचारात घेतल्या. प्रतिवादीच्या कैफियतीतील आक्षेप विचारात घेतला. त्यामध्ये दाव्याची आकारणी व योग्य मुद्रांक दिलेला नाही असा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. वादी केवळ दाव्याची आकारणी बदलून योग्य तो अधिक मुद्रांक शुल्क देत आहे. वादीने केलेली सध्याची आकारणी ही योग्य आहे किंवा नाही याबाबतीत प्रतिवादींना पुन्हा बचाव मांडण्याची संधी आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर फारसा मोठा फरक पडत नाही. सबब अर्ज मंजूर करण्यात येतो. खर्चाबद्दल आदेश नाही. वादीने १४ दिवसांत दुरुस्ती करुन दुरुस्ती दाव्याची प्रत सादर करावी. प्रतिवादींना कैफियत देण्यास मुभा आहे.

सही/—

(संतोष द. चव्हाण )

दि. १६/०२/२०१६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.